# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे








दैनिक | वर्ष १ | अंक १६८ | शुक्रवार, ९ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


## संक्षिप्त

### पुणे-नागपूर दरम्यानच्या अनेक रेल्वे गाड्या तब्बल २२ दिवस रद्द

**पुणे, ता. ८ :** पुणे ते नागपूर दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मध्य रेल्वेच्या पुणे विभागांतर्गत दौंड ते मनमाड रेल्वे मार्गावर सुरू असलेल्या दुहेरीकरणाच्या कामामुळे अनेक महत्त्वाच्या रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. या कामाचा थेट परिणाम पुणे आणि नागपूर दरम्यान धावणाऱ्या रेल्वेसेवांवर झाला असून तब्बल २२ दिवस काही गाड्या रद्द राहणार आहेत. पुणे आणि नागपूर दरम्यानची रेल्वे वाहतूक हा महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचा दुवा मानला जातो. या मार्गावर दररोज मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. पुणे-नागपूर एक्सप्रेस, पुणे-नागपूर हमसफर एक्सप्रेस आणि पुणे-नागपूर गरिब रथ एक्सप्रेस या गाड्या प्रवाशांमध्ये विशेष लोकप्रिय आहेत. मात्र दौंड ते मनमाड दरम्यान सुरू असलेल्या दुहेरीकरणाच्या कामामुळे या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. दौंड आणि काष्टी स्थानकांदरम्यान दुहेरीकरणाचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. या ठिकाणी प्री-नॉन इंटरलॉकिंग आणि नॉन-इंटरलॉकिंगचे काम सुरू असून हे काम २५ जानेवारीपर्यंत चालणार आहे.

# गुन्ह्यात जप्त केलेला आठ लाखांचा मुद्देमाल मूळ मालकांना परत

## लोणी काळभोर पोलिसांकडून १६ गुन्ह्यांची उकल; नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद

**लोणी काळभोर, ता. ८ :** दरोडा, घरफोडी, चोरीयासारख्यागंभीरगुन्ह्याचा तपास लावून लोणी काळभोर पोलिसांनी १६ गुन्ह्यातील तब्बल ८ लाख ५० हजार रुपयांहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. हा मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशाने नागरिकांना परत देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. तर अनेक नागरिकांनी पोलीस प्रशासनाच्या काम गिरीचे भरभरून कौतुक करून आभार मानले आहेत.

महाराष्ट्र पोलीस दलाचा २ जानेवारी हा स्थापना दिवस आहे. या दिवसाचे औचित्य साधून सप्ताहामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन हा दिवस मोठ्या उत्साहाने महाराष्ट्र पोलीस स्थापना दिवस म्हणून साजरा करायचा आहे, असे आदेश पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिलेले आहेत. त्या अनुषंगाने परिमंडळ ६ कार्यक्षेत्रातील मुद्देमाल वितरण समारंभाचा कार्यक्रम विमाननगर येथील सिम्बायोसिस स्कूल



ऑफ इंटरनॅशनलमधील सभागृहात गुरुवारी (ता. ८) सहा वाजता पार पडला.

यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल फिर्यादी यांना परत केला. यावेळी पुणे शहर पोलीस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त हेमंत जाधव, निखील पिंगळे, सोमई मुंडे व पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

या समारंभामध्ये परिमंडळ ६ कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्यातील वेगवेगळ्या कलमांना अनुसरुन दाखल असलेल्या गुन्ह्यांमधील मुद्देमाल (त्यामध्ये दुचाकी, तिनचाकी व चारचाकी वाहने, मोबाईल फोन, सोन्या चांदीचे दागिणे व रोख रक्कम) पोलिसांनी जप्त केला होता. हा मुद्देमाल न्यायालयाने आदेशित केलेला व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता सन २०२३ चे कलम १०६ म धील तरतुदीनुसार देय असलेला किंमती मुद्देमाल संबंधित फिर्यादी यांना परत करण्यात आला आहे.

### मुद्देमाल परत दिलेल्या नागरिकांची नावे पुढीलप्रमाणे

१) सोन्या चांदीचे दागिने : किर्ती परमेश्वर शिंदे, संगिता पंडीत बोडके, भीमाबाई भिव केसकर, वैष्णवी मयूर देवकर, वेणूबाई बाजीराव चौधरी, सचिन बबन तांबे, रंगनाथ संभाजी ढगे, निरंजनकुमार जितेंद्रकुमार सिंग.
२) वाहने : वैशाली हरिश्चंद्र दुर्गाडे, सिध्देश राजेंद्र राजपुरे, ज्ञानेश्वर भास्कर पानसरे, सचिन जयवंत औटी, राजेंद्र बबनराव काळभोर.
३) मोबाईल फोन : रंजु विठ्ठलराव पाटील, नामदेव विकास पवार, स्वप्नील ईश्वर काळे.

लोणी काळभोर पोलिसांनी मोठ्या शिताफीने कारवाई करून १६ गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये ८ गुन्ह्यांमधील ५ लाख ४१ हजार ६९८ रुपये किंमतीचे सोने, तर ५ गुन्ह्यातील २ लाख ३० हजार रुपये किंमतीची ५ दुचाकी, तर ९३ हजार रुपये किंमतीचे महागडे मोबाईल असा सुमारे ८ लाख ६७ हजार ६९८ रुपयांचा मुद्देमाल नागरिकांना परत केला आहे. यावेळी नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होते. नागरिकांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले. यावेळी आपणही पोलीस दलाच्या माध्यमातून चोख कर्तव्य बजावीत असून नागरिकांची सेवा करीत आहोत. असे पोलीस बांधवांच्या चेहऱ्यावरील समाधाना मुळे स्पष्ट दिसून येत होते.

दरम्यान, यावेळी लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक केतकी चव्हाण, पोलीस हवालदार महेश चव्हाण, वैजिनाथ शेलार, रवी आहेर, सोमनाथ गळाकाटे, उषा थोरात, नीलम धांडे व पोलीस अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### लाडकी बहीण योजनेत फसवणूक भोवली; बुलढाण्यात ६ महिला कर्मचाऱ्यांवर कारवाई

**बुलढाणा, ता. ८ :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेणाऱ्या ६ महिला कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई केलीय. शासकीय सेवेत असूनही उत्पन्नाची चुकीची माहिती देऊन या कर्मचाऱ्यांनी लाभ लाटला होता. तपासणीअंती या ६ महिलांकडून आतापर्यंत मिळालेली प्रत्येकी १६ हजार ५०० रुपये याप्रमाणे एकूण ९९ हजार रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

उर्वरित १९० अर्धवेळ कर्मचाऱ्यांचे उत्पन्न मर्यादेत असल्याने त्यांना पात्र ठरवण्यात आले. मात्र, शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी या सहा कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कायदेशीर कारवाईचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठवण्यात आलाय. या कारवाईमुळे सधन असूनही योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे धाबे दणाणलेत.

## तुमको मिरची लगी तो मैं क्या करुं; कल्याणच्या सभेत देवेंद्र फडणवीसांची तुफानी बॅटिंग

**मुंबई, ता. ८ :** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या निवडणुकीत पहिल्याच टप्प्यात महायुतीचे २१ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राज्याच्या राजकारणात चर्चा सुरू झाली आहे. या मुद्द्यावरून विरोधकांकडून जोरदार टीका होत असताना, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर स्पष्ट आणि आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे. काहींना पोटदुखी झाली आहे, तुमको मिरची लगी तो मैं क्या करु, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांना टोला लगावला.

कल्याण पूर्व येथे आयोजित जाहीर प्रचार सभेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. त्यांनी सांगितले की, विरोधकांकडे निवडणुकीसाठी उमेदवारच नव्हते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि



भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. यामध्ये चुकीचे काय आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.


मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महायुतीचे उमेदवार निवडून आले की विरोधकांकडून लगेच नवा नरेटिव्ह तयार केला जातो. आधी ईव्हीएमवर आरोप झाले, आता बिनविरोध निवडींवर टीका सुरू आहे. यापूर्वी संसदेत ३५ खासदार बिनविरोध निवडून आले होते, त्यापैकी ३३ खासदार काँग्रेसचे होते. तेव्हा लोकशाही धोक्यात आली नव्हती, पण आता महायुतीचे उमेदवार निवडून आले की लोकशाहीची हत्या झाली असे म्हणणाऱ्यांनी आरशात पाहावे, असा सल्लाही त्यांनी दिला. पुढे बोलताना मुख्यमंत्रीफडणवीसयांनीविकासकामांचा उल्लेख केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात महाराष्ट्राला ५० हजार कोटी रुपयांचा विकास निधी मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले. २०१४ पूर्वी मुंबई महानगर प्रदेशातील शहरांना पुरेसा निधी मिळत नव्हता. मात्र महायुती सरकारच्या काळात एमएमआर रिजनसाठी ४ लाख कोटी रुपयांचा निधी देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

१५ जानेवारी रोजी कमळ आणि धनुष्यबाणाच्या चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुढील ५ वर्षे तुमची चिंता आम्ही करू. कल्याण डोंबिवली ही एमएमआर रिजनमधील सर्वोत्तम महापालिका बनवण्याची हमीही त्यांनी यावेळी दिली.

## अष्टापूर येथे बिबट्याच्या हल्ल्यात तीन मेंढ्या मृत्युमुखी; उपाययोजना करण्याची नागरिकांची मागणी

**उरुळी कांचन, ता. ८ :** अष्टापूर माळवाडी येथील बिरोबाचा माळ परिसरात मागील दोन दिवसात बिबट्याच्या हल्ल्यात तीन बकऱ्या जागीच ठार झाल्या. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच पशुधनावर सातत्याने बिबट्यांचे हल्ले होत असल्याने शेतकरी भयभीत झाले आहेत. बिबटे नागरी वस्तीत येऊ नये यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी ग्रामस्थांनी वनविभागाकडे केली आहे.

ग्रामपंचायत हद्दीतील माळवाडी येथील सचिन गुलदगड या शेतकऱ्यांच्या बकऱ्यांवर बुधवारी रात्री बिबट्याने हल्ला केला. यापूर्वी दोन दिवसांपूर्वी याच परिसरात दादा शेंडगे या शेतकऱ्यांची एक बकरी बिबट्याच्या हल्ल्यात ठार झाली



होती. सातत्याने होणाऱ्या हल्ल्यांमुळे अष्टापूर माळवाडी परिसरात बिबट्याचा वावर वाढला आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अष्टापूर परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिक मोठया प्रमाणात भयभीत झाले आहेत.

अष्टापूर परिसरात एका बिबट्याला यापूर्वी जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले होते. तसेच मागील आठ दिवसांपूर्वी एका ऊसाच्या फडात दोन बछडेहि आढळून आले होते. दिवसा ढवळ्या बिबटे शेतकऱ्यांना बांधावर, उसाच्या फडात दिसत आहेत. ऊसतोड सुरु असल्याने फड मोकळे होत आहेत. त्याचा परिणाम बिबटे नागरी परिसरात दिसून येत आहेत. वन विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक शामराव कोतवाल, अष्टापूर गावच्या सरपंच पुष्पा कोतवाल, माजी सरपंच कविता जगताप, उपसरपंच संजय कोतवाल, माजी उपसरपंच सोमनाथ कोतवाल, दत्तात्रेय कटके, राजेश कोतवाल तसेच आदींनी वनविभागाकडे परिसरात तातडीने जास्तीत जास्त पिंजरे लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी केली आहे. वनविभागाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अन्यथा शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### राष्ट्रवादीकडून लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांना उमेदवारी अर्ज

**पुणे, ता. ८ :** पुण्यातील आयुष कोमकर हत्या प्रकरणात कारागृहात असलेल्या आंदेकर कुटुंबातील सदस्य निवडणुकीच्या मैदानात उतरले आहे. अजित पवार गटाकडून लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांनी उमेदवारी अर्ज भरले असून त्यांच्या अनुपस्थितीत कुटुंबातील इतर सदस्यांनी प्रचाराची धुरा हाती घेतली आहे. नुकत्याच झालेल्या एका सभेत वनराज आंदेकर यांची मुलगी आपल्या आईच्या आणि आजीच्या प्रचारासाठी मैदानात उतरली. यावेळी तिने वडिलांनी केलेल्या कामांचा उल्लेख करत आईला न्याय मिळवून देण्याचे भावनिक आवाहन मतदारांना केले. दुसरीकडे लक्ष्मी आंदेकर यांच्या जामीन अर्जावर १६ तारखेला महत्त्वाची सुनावणी होणार आहे. विशेष म्हणजे ज्या दिवशी महानगरपालिका निवडणुकीचा निकाल लागेल, त्याच दिवशी ही सुनावणी होणार असल्याने याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उरुळी कांचन जिल्हा परिषद गटातून जितेंद्र बडेकर निवडणूकीच्या रिंगणात; विकास, शिक्षण व भ्रष्टाचारमुक्त कारभार करण्याचा अजेंडा

**उरुळी कांचन, ता. ८ :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना, पुणे जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर उरुळी कांचनचे माजी उपसरपंच आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू मानले जाणारे जितेंद्र बडेकर यांनी उरुळीकांचन-सोरतापवाडी जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली आहे.

जितेंद्र बडेकर हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. बडेकर कुटुंबीय गेल्या २० ते २५ वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहून हवेली तालुक्यात पक्षसंघटन बांधणीचे काम करत आहेत. जितेंद्र बडेकर यांनी यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष म्हणून नऊ वर्षे काम केले आहे. त्यामुळे उरुळी कांचन-सोरतापवाडी गटातून ते राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे प्रबळ उमेदवार मानले जात आहेत.

पुणे प्राईम न्यूजशी संवाद साधताना बढेकर यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. मी पक्षाशी, गावाशी आणि जनतेशी सुरुवातीपासून एकनिष्ठ आहे. राजकारण माझ्यासाठी व्यवसाय नाही. मी व्यवसायिक असलो तरी मी आणि माझे कुटुंब टक्केवारी व भ्रष्टाचारापासून दूर राहिलो आहोत. मायबाप जनतेची कामे करण्यासाठीच मी निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहे, असे त्यांनी सांगितले.

गटातील समस्यांबाबत बोलताना त्यांनी उरुळी कांचनमधील वाहतूक कोंडीचा प्रश्न, बसथांबा उभारणी तसेच मेट्रो उरुळी कांचनपर्यंत आणण्याची गरज अधोरेखित केली. सोरतापवाडीतील गावठाण प्रश्न,



शेतकऱ्यांना मिळणारा अपुरा मोबदला आणि बाजारपेठे अभावी होणारे नुकसान याकडेही त्यांनी लक्ष वेधले. सोरतापवाडीत आठवडी बाजार सुरू झाला तर हे गाव महसुली गाव होईल आणि शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी बाहेर जाण्याची गरज भासणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षणाबाबत बोलताना बडेकर म्हणाले की, जिल्हा परिषद शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्याची गरज आहे. खासगी शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. जिल्हा परिषद शाळांचे डिजिटलीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रशिक्षण, तसेच एमपीएससी-यूपीएससीसाठी अभ्यासिका व मार्गदर्शन केंद्रे सुरू करणे हे माझे प्राधान्य राहील. मी स्वतः जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेतले असून काळानुसार शाळांमध्ये बदल होणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना त्यांनी बिबट्याच्या वावरामुळे दिवसभर वीजपुरवठ्याची गरज, तसेच शासकीय योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. गटातील सहकारी संस्थांची कार्यालये संबंधित गावांतच सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

तरुणांच्या रोजगाराबाबत विचारले असता, कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा, रोजगार मेळावे, तसेच महाविद्यालयीन स्तरावर मार्गदर्शन कार्यक्रम राबवण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. निवडणूक काळात दिल्या जाणाऱ्या प्रलोभनांबाबत ते म्हणाले, मी कोणतेही प्रलोभन दिलेले नाही. खेळ पैठणीसारख्या कार्यक्रमांपेक्षा मी थेट तीन हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्य दिले आहे.

महिला सक्षमीकरणासाठी बचतगट अधिक सक्षम करून त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा पातळीवरील प्रशासन भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मी उपसरपंच असताना स्वतः घरचा डबा घेऊन कामावर जात होतो. तेव्हा माझा भ्रष्टाचार मुक्त कारभार होता, आताही आहे आणि भविष्यातही राहील. कँत्राटदारांना कामांचे फलक लावणे बंधनकारक आहे. बऱ्याच ठिकाणी तसे होत नाही. जनतेनेही त्याबाबत जाब विचारला पाहिजे. उद्या मी जिल्हा परिषद सदस्य झालो तरी जिल्हा परिषदेचा चहासुद्धा पिणार नाही, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले.

जनतेशी संवादाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, गेल्या २० वर्षांपासून त्यांचे कुटुंब जनतेशी थेट संपर्कात आहे. आमचे वडील बाळासाहेब बडेकर यांच्या विचारांचा वारसा आम्ही पुढे नेत आहोत. निवडून आल्यानंतर माणूस बदलतो, असे माझ्याबाबत होणार नाही. जनता हीच राजा आहे. जनतेचे प्रश्न सोडवणे हेच माझे काम असून ते मी प्रामाणिकपणे करणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## संक्षिप्त

### आयुर्वेदिक उपचार केंद्राच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश

**पुणे, ता. ८ :** पुणे शहरातील आनंदनगर सिंहगड रोड परिसरात आयुर्वेदिक उपचार केंद्राच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंधक कक्षाने 'मनाली आयुर्वेदिक उपचार केंद्र' या ठिकाणी बनावट ग्राहक पाठवून खात्री केली आणि त्यानंतर छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी एका पीडित महिलेची सुटका केली असून, तिला पैशांचे आमिष दाखवून या व्यवसायात ढकलण्यात आले होते. या प्रकरणी स्पा चालक विद्या मदन मंडले आणि प्रमोद बबन खाटपे यांच्यासह एका अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून २३ हजार २०० रुपयांची रोकड आणि मोबाईल फोन जप्त केले आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक आशालता खापरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी सायंकाळी ४ वाजून ४५ मिनिटांनी ही धडक कारवाई करण्यात आली. तपासात असे समोर आले की, आरोपी पीडित महिलेकडून वेश्याव्यवसाय करून घेत होते आणि त्यातून ती मिळणाऱ्या पैशांवर स्वतःची उपजीविका भागवत होते. मॅनेजर म्हणून काम पाहणाऱ्या एका मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे. सिंहगड रोड सारख्या मुख्य परिसरात अशा प्रकारे अवैध धंदे सुरू असल्यामुळे नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

### स्वारगेट परिसरात ज्येष्ठ नागरिकाच्या पिशवीतून ३ लाखांच्या दागिन्यांची चोरी


**पुणे, ता. ८ :** स्वारगेट एसटी स्थानक परिसरात एका ६६ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाच्या पिशवीतून ३ लाख ४१ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मूळचे सातारा जिल्ह्यातील रहिवासी असलेले हे ज्येष्ठ नागरिक ५ जानेवारी रोजी वैयक्तिक कामानिमित्त साताऱ्याहून पुण्यात आले होते. सायंकाळी ७ च्या सुमारास ते स्वारगेट परिसरात पायी जात असताना चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या पिशवीवर डल्ला मारला. काही अंतर चालून गेल्यावर पिशवीची चैन उघडी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. तपासणी केली असता पिशवीतील सोन्याचे दागिने गायब झाल्याचे पाहून त्यांना मोठा धक्का बसला. चोरट्यांनी गर्दीच्या वेळी अत्यंत शिताफीने हे दागिने लंपास केले होते. या प्रकरणी पीडित नागरिकाने स्वारगेट पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली आहे. स्वारगेट पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे. स्थानक परिसरातील प्रचंड गर्दीचा गैरफायदा घेऊन ही चोरी करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

### सर्वांगीण विकासासाठी भाजपला साथ द्या : चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन



**पुणे, ता. ८ :** भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून विकसित पुण्याची मुहूर्तमेढ रोवली असून, पुण्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभाग क्रमांक (रविवार पेठ- नाना पेठ) मधील उमेदवारांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहन भाजपचे राज्याचे निवडणूक प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. या प्रभागातील भाजपच्या अधिकृत उमेदवार ऋतुजा तेजस गडाळे, पल्लवी जावळे, अनुराधा मंचे, विशाल धनवडे यांच्या मध्यवर्ती निवडणूक कचेरीचे उद्घाटन बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते.ही निवडणूक कचेरी प्रभाग समस्यामुक्त करण्यासह, भविष्यात केंद्र व राज्य शासनाच्या सुमारे १०० हून अधिक योजनांचा लाभ प्रभागातील नागरिकांना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या वेळी आमदार हेमंत रासने, भाजपा महामंत्री राजेशजी पांडे, भाजयुमो प्रदेश सचिव तेजस गडाळे, कसबा विधानसभा समन्वयक राजेंद्र काकडे प्रभाग अध्यक्ष सनी पवार, तसेच सर्व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांचे निधन



**पुणे, ता. ८ :** ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी पुण्यात निधन झाले आहे. जानेवारी रोजी रात्री ११ वाजता पुण्यातील डॉ. शिरीष प्रयाग हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून ते आजारपणामुळे उपचार घेत होते. ८ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी त्यांचे पार्थिव पाषाण येथील निवासस्थानी अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. डॉ. गाडगीळ यांनी पश्चिम घाटाच्या रक्षणासाठी दिलेला लढा आणि २०११ मध्ये सादर केलेला गाडगीळ समितीचा अहवाल हा पर्यावरण क्षेत्रातील मैलाचा दगड मानला जातो. निसर्गाचा कोप टाळण्यासाठी संवेदनशील भागातील मानवी हस्तक्षेप थांबवण्याचा इशारा त्यांनी दिला होता. हार्वर्ड विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या गाडगीळ यांनी कायम लोकांच्या सहभागातून पर्यावरण रक्षणाचा पुरस्कार केला. त्यांच्या जागतिक स्तरावरील योगदानासाठी २०२४ मध्ये संयुक्त राष्ट्राने त्यांना चॅम्पियन्स ऑफ द अर्थ या पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांच्या निधनाने सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# तरडे येथील गावपुढाऱ्याकडून टँकर चालकाला मारहाण; चालकांचे डेपोसमोर आंदोलन

## लोणी काळभोर पोलिसांच्या मध्यस्थीने मिटला वाद

**हनुमंत चिकणे**

उरुळी कांचन, ता. ८ : तरडे (ता. हवेली) येथील डेपोतून पेट्रोल-डीझेलची वाहतूक करणाऱ्या एका टँकर चालकला येथील एका गावपुढाऱ्याने एका टँकर चालकास मारहाण केल्याची घटना घडली. गुरुवारी (ता. ०८) सकाळी साडेनऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेने टँकर चालकांमध्ये संतापाची लाट उसळली व या घटनेच्या निषेधार्थ टँकर चालकांनी डेपोसमोर एकत्र येत आंदोलन छेडले. त्यामुळे काही काळ डेपोतील कामकाज ठप्प झाले होते. अनिल जगताप (पूर्ण नाव माहित नाही. रा. तरडे) असे मारहाण करणाऱ्या गावपुढाऱ्यांचे नाव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, देवकर (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही) हे टँकर चालक असून तरडे येथील डेपोतून पेट्रोल-डीझेलच्या इंधनाची वाहतूक करतात. डेपोत पार्किंगचे काम सुरु असल्याने काही चालक हे कंपनीच्या बाहेर टँकर उभे करतात. यावेळी देवकर हे टँकर हा रस्त्याच्या बाजूला लावत होते. यावेळी अनिल जगताप हे रस्त्यावरून पुढे निघाले होते. त्याचवेळी देवकर हे टँकर वळवून रस्त्याच्या बाजूला लावत असल्याने त्यांना हात दाखवून थांबण्याचे सांगितले.

या गोष्टीचा जगताप यांना राग अनावर झाला व त्यांनी देवकर यांच्या कानाशिलात मारली. व त्या ठिकाणावरून निघून गेले. अशी माहिती काही नागरिकांनी दिली. या घटनेच्या निषेधार्थ चालकांनी पुढाऱ्यांकडून होणाऱ्या सततच्या त्रासाला कंटाळून संबंधित डेपोसमोर आंदोलन छेडले. कामात अडथळे, अनावश्यक अडवणूक आणि दडपशाही होत असल्याचा आरोप करत टँकर चालकांनी काम बंद आंदोलन केले, त्यामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, आंदोलनाची माहिती मिळताच लोणी काळभोर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आंदोलनकर्त्या चालकांशी तसेच डेपो प्रशासनशी चर्चा करून मध्यस्थी केली. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन गैरसमज दूर करण्यात आले. या घटने मुळे डेपोतील कामकाज सुरळीत सुरू झाले असून, भविष्यात अशा प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी टँकर चालकांनी केली आहे.


**कारवाई होणार का?**

तरडे येथील पेट्रोल-डीझेलची वाहतूक करणाऱ्या एका टँकरचालकांना या परिसरातील व तरडे गावातील इतरही गावपुढारी टँकर पेटवून देऊ, काच फोडेन, चालकांना धमक्या देत आहेत. तसेच वारंवार त्रास देत आहेत. त्यामुळे अशांवर पोलीस कारवाई करणार का याकडे पेट्रोल-डीझेलची वाहतूक करणाऱ्या टँकर चालकांचे व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# शिवसेनेचे शहरप्रमुख नाना भानगिरे यांच्या गाडीवर दगडफेक; उमेदवार जखमी

**पुणे, ता. ८ :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत पुण्यातील वातावरण तापले आहे. आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच हडपसर परिसरात प्रचारादरम्यान दगडफेकीची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे पुणे शहरप्रमुख नाना भानगिरे यांच्या ताफ्यावर अज्ञातांनी हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत भानगिरे यांच्या कारचे नुकसान झाले असून महिला उमेदवार सारिका पवार या जखमी झाल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी ता ७ रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास नाना भानगिरे आणि प्रभाग क्रमांक ४१ मधील उमेदवार सारिका पवार या आपल्या कार्यकर्त्यांसह हडपसर मधील काळेपडळ परिसरातील मयूर जेएमएनएस सोसायटी परिसरात प्रचारासाठी गेले होते. मतदारांच्या गाठीभेटी सुरू असतानाच अचानक काही अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या दिशेने दगडफेक करण्यास सुरुवात केली.



या दगडफेकीत नाना भानगिरे यांच्या वाहनाची काच फुटली, तर एक दगड लागल्याने उमेदवार सारिका पवार यांच्या हाताला दुखापत झाली.

या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच काळेपडळ पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात असून हल्लेखोरांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन पोलिसांनी दिले आहे.

दरम्यान, नाना भानगिरे यांनी या घटनेचा निषेध करत निवडणुकीच्या काळात अशा प्रकारचे हल्ले करणे चुकीचे असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. काही वेळानंतर परिस्थिती नियंत्रणात आली असून परिसरात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली आहे.

## लोणी काळभोर येथे जागेच्या वादातून मायलेकाला मारहाण

**लोणी काळभोर, ता ८ :** जागेच्या वादावरून मायलेकांना मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील अष्टापुरमळा परिसरात सोमवारी (ता. ५) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संजय लक्ष्मण काळभोर (वय ४०, रा. बाजारमळा, लोणी काळभोर ता. हवेली जि. पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी रोहित धनाजी करंडे (वय २१, रा. चिंतामणी पार्क सोसायटी, अष्टापुरमळा, लोणी काळभोर ता. हवेली जि. पुणे) यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रोहित करंडे हे पुणे इंटरनॅशल पब्लिक स्कुल शेजारी असलेल्या चिंतामणी पार्क सोसायटीत राहतात. सोमवारी आरोपी संजय काळभोर हे फिर्यादी रोहित करंडे यांच्या राहत्या घराच्या समोर आहे. आणि फिर्यादी करंडे यांना म्हणाले, इथली जागा खाली करायची, माझ्या जागेमध्ये राहायचे नाही, हा काय तुझ्या बापाचा रोड आहे का? असे म्हणुन आरोपी संजय काळभोर याने फिर्यादी रोहित करंडे यांना लाथाबुक्यांनी तोंडावर, छातीवर, हातावर मारहाण करून जखमी केले. दरम्यान, ही भांडणे सोडविण्यासाठी फिर्यादी रोहित करंडे यांच्या आईने मध्यस्ती करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आरोपी संजय काळभोर याने त्यांनाही लाथाबुक्यांनी मारहाण करुन ढकलुन दिले व तुम्ही इथे कसे राहता ते बघतोच, तुमचे घर जे.सी.बी. ने पाडले नाही तर नावाचा संजय काळभोर नाही. अशी धमकी संजय काळभोर यांनी फिर्यादी रोहित करंडे यांच्या कुटुंबाला दिली.

## पुण्यातील जेष्ठ नागरिकाची सायबर चोरट्याकडून ३० लाखांची फसवणूक

**पुणे, ता. ८ :** पुणे शहरात सायबर गुन्हेगारीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांची फसवणूक सुरूच आहे. बुधवारी शहरात सव्वा कोटी रुपयांच्या सायबर फसवणुकीच्या घटना उघडकीस आल्या होत्या. त्यात आता आणखी एका घटनेची भर पडली आहे. शेअर बाजारात गुंतवणुकीच्या नावाखाली कर्वे रस्ता परिसरातील एका ७८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची २९ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. अल्पावधीत मोठा परतावा देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी ही फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी अलंकार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फोन आला अन् खेळ खल्लास मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी तक्रारदार ज्येष्ठ नागरिकांच्या मोबाईलवर




अनोळखी व्यक्तीचा फोन आला. फोन करणाऱ्याने स्वतःला शेअर बाजारातील तज्ज्ञ असल्याचे सांगून विविध गुंतवणूक योजनांची माहिती दिली. कमी कालावधीत मोठा नफा मिळेल, असे सांगून त्यांचा विश्वास संपादन करण्यात आला. सुरुवातीला नागरिकांनी थोडी रक्कम गुंतवली. त्यानंतर चोरट्यांनी एका बनावट पच्या माध्यमातून गुंतवणुकीवर मोठा नफा झाल्याचे दाखवले.

**रक्कम भरायला सांगितली आणि नंतर फरार**

नफा दिसत असल्याने नागरिकांनी अधिक गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. चोरट्यांच्या सांगण्यावरून त्यांनी वेगवेगळ्या टप्प्यांत २९ लाख ३० हजार रुपये विविध बँक खात्यांमध्ये जमा केले. मात्र, जेव्हा त्यांनी गुंतवलेली रक्कम आणि नफा परत काढण्याचा प्रयत्न केला, तेव्हा संबंधित व्यक्तींचे फोन बंद आले. तसेच पवरही कोणतीही माहिती दिसेनाशी झाली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच ज्येष्ठ नागरिकांनी अलंकार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनीता रोकडे करत आहेत. अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या फोन कॉल, मेसेज किंवा गुंतवणुकीच्या ऑफरवर विश्वास ठेवू नये. तसेच कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करून पैसे पाठवू नयेत, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

## अतिप्रमाणात मद्य पाजल्यामुळे तरुणाचा मृत्यू; दोघांना अटक

**पुणे, ता. ८ :** पैज लावून अतिप्रमाणात मद्य पाजल्यामुळे एका तरुणाचा मृत्यू झाल्याची आणि त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाची विल्हेवाट लावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना ३० डिसेंबर २०२५ रोजी नवलाख उंब्रे येथील एका शेतात घडली आहे. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक दीपक खरात यांनी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी कृष्णा सिंह वय ३५ रा. नवलाख उंब्रे मूळ रा. रोहतास बिहार याला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत रामकुमार साह याच्यासोबत आरोपींनी पैज लावली होती. या पैजेअंतर्गत रामकुमार साह याला एकाच वेळी मोठ्या प्रमाणात




मद्य पिण्यास भाग पाडण्यात आले. मद्याचे अतिसेवन झाल्यानंतर रामकुमार साह याची प्रकृती गंभीररीत्या बिघडली. मात्र आरोपींनी त्याला कोणतेही वैद्यकीय उपचार दिले नाहीत. वेळेवर उपचार न मिळाल्या मुळे रामकुमार साह याचा मृत्यू झाला.

मृत्यू झाल्यानंतर आपला गुन्हा उघडकीस येऊ नये म्हणून आरोपींनी पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मृतदेहाची विल्हेवाट लावून घटना लपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र या प्रकरणाची माहिती पोलिसांना मिळताच तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली. तपासादरम्यान आरोपींची भूमिका संशयास्पद आढळून आली.

पोलीस उपनिरीक्षक दीपक खरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तळेगाव एमआयडीसी पोलीस करत आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून पैज लावून मद्य पिण्यास भाग पाडण्याच्या प्रकारांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## राज्यातील शेतकऱ्यांना फार्मर आयडी नसल्यास ६ योजनांचा लाभ मिळणार नाही

**पुणे, ता. ८ :** राज्य आणि केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांसाठी विविध कृषी योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा उद्देश शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेतीचा खर्च कमी करणे आणि आर्थिक सुरक्षितता देणे हा आहे. मात्र आता शासनाने शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी म्हणजेच शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. हा फारमर आयडी नसेल तर भविष्यात अनेक महत्त्वाच्या कृषी योजनांचा लाभ मिळणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी वेळीच फार्मर आयडी काढणे आवश्यक ठरणार आहे.

फार्मर आयडी हा प्रत्येक शेतकऱ्याला दिला जाणारा एक डिजिटल ओळख क्रमांक आहे. हा फार्मर आयडी आधार कार्ड, सातबारा उतारा, बँक खाते आणि मोबाईल क्रमांकाशी जोडलेला असतो. या ओळखीच्या आधारे शेतकऱ्याची जमीन, पीक, पीक पद्धत आणि विविध शासकीय योजनांचा लाभ




एका डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदवला जातो. शासनाच्या मते, यामुळे योग्य आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंत थेट लाभ पोहोचवणे सोपे होणार आहे.

फार्मर आयडी नसल्यास पीएम किसान योजनेअंतर्गत दरवर्षी मिळणारे ६ हजार रुपये थेट खात्यात जमा होण्यास अडचण येऊ शकते. तसेच प्रधानमंत्री फसल विमा योजनेत नुकसान भरपाई मिळवण्यासाठीही फार्मर आयडी आवश्यक असणार आहे. महाडीबीटी पोर्टलवरील बियाणे, खते, कृषी अवजारे, ठिबक व तुषार सिंचन, शेततळे, पॉवर टिलर, ट्रॅक्टर यांसारख्या अनुदान योजनांसाठी अर्ज करताना फार्मर आयडी बंधनकारक केला जाण्याची शक्यता आहे. पीक कर्ज, व्याज सवलत, कर्जमाफी योजना तसेच अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीत नुकसान भरपाई मिळवण्यासाठीही फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे. शासकीय खरेदी केंद्रांवर हमीभाव मिळवतानाही हा आयडी महत्त्वाचा ठरू शकतो. फार्मर आयडी ऑनलाइन किंवा स्थानिक कृषी कार्यालय, सेवा केंद्र आणि महा-ई-सेवा केंद्रातून काढता येतो. यासाठी आधार कार्ड, सातबारा उतारा, बँक पासबुक आणि मोबाईल क्रमांक आवश्यक आहे.

## पुण्यात मतदानाच्या नव्या 'पॅटर्न'मुळे नेते चक्रावले

**पुणे, ता. ८ :** पुण्यातील बालेवाडी परिसरातील सिलिकॉन व्हॅली आणि संस्कृती होम सोसायटीतील रहिवाशांनी ममता चौकातील वाईन शॉपविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. या वाईन शॉपमुळे परिसरात मद्यपींचा वावर वाढला असून, त्याचा रहिवाशांच्या सुरक्षिततेवर आणि विशेषतः लहान मुलांच्या भविष्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा गंभीर आरोप रहिवाशांनी केला आहे. वारंवार तक्रार करूनही तोडगा निघत नसल्याने, आता नागरिकांनी या प्रश्नाचा संबंध थेट मतदानाशी जोडला आहे. आगामी निवडणुकीत जो उमेदवार हे वाईन शॉप हटवण्याचे लेखी आणि स्पष्ट



आश्वासन देईल, त्यालाच मतदान करण्याचा एकमुखी निर्णय रहिवाशांनी घेतला आहे.

रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, ममता चौकातील वाईन शॉप हे तीन शाळांच्या सुमारे १५० मीटरच्या परिसरात सुरू आहे. शाळेजवळ दारूची दुकाने असू नयेत, असे स्पष्ट नियम असतानाही हे दुकान सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे. याबाबत अनेक वेळा संबंधित विभागांकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या निषेधासाठी रहिवाशांनी सोसायटीच्या इमारतीच्या प्रवेशद्वारावर पोस्टर्स लावले होते. या पोस्टर्समध्ये वाईन शॉप हटवणाऱ्या उमेदवारालाच मतदान केले जाईल, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. रहिवासी अनंत भुकेले पाटील यांनी सांगितले की, वाईन शॉपमुळे परिसरात दारू पिऊन भांडणे, मारामारी आणि गोंधळाचे प्रकार नेहमीच घडत आहेत. संध्याकाळी आणि रात्री उशिरा असामाजिक कृत्यांमध्ये वाढ होते. रस्त्यावर आरडाओरडा, शिवीगाळ आणि उपद्रव यामुळे कुटुंबांसाठी परिसर असुरक्षित बनला आहे. वाईन शॉपच्या उपस्थितीमुळे मालमत्तेच्या किमतीही घसरल्याचा दावा रहिवाशांनी केला आहे. अनेक घरमालकांना आपली घरे भाड्याने देताना अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## महापालिका निवडणुकीसाठी भाजपचं संकल्पपत्र जाहीर

**पुणे, ता. ८ :** महापालिका निवडणुकीसाठी भाजपनं आपलं संकल्पपत्र जाहीर केले. या जाहीर केलेल्या संकल्पपत्रात पुढील पाच वर्षांत पालिका स्वतःच्या आर्थिक क्षमतेतून शहराचा विकास करण्यापेक्षा केंद्र व राज्य सरकारच्या निधीवर आधारित प्रकल्पांवर भर देण्यात आला आहे.

हा पानी संकल्पपत्रात प्रामुख्याने पुण्याला ग्लोबल केपेबिलिटी सेंटर (जीसीसी)ची राजधानी करणे, शहराच्या चारही दिशांना मेट्रोचा विस्तार, विमानतळाचा विस्तार, महामार्गांचे रुंदीकरण, वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी हजार ई-बस, एआय प्रणालीचा वापर, मध्यमवर्गीयांसाठी हक्काची घरं यासह अनेक आश्वासनं देण्यात आलीत. गेल्या दहा वर्षांत केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून पुण्यात झालेल्या व प्रगतीपथावरील कामांचाही यात समावेश केलाय.

# हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रोचे काम अंतिम टप्प्यात



**पुणे, ता. ८ :** पुण्यातील हिंजवडी आयटी हबला शिवाजीनगरशी जोडणाऱ्या पुणे मेट्रो लाईन ३ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा एक महत्त्वाचा टप्पा आज पूर्ण झाला आहे. ८ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता माण डेपो ते पुणे विद्यापीठ चौक या मार्गावर मेट्रोची तांत्रिक चाचणी यशस्वीपणे पार पडली. ही चाचणी कोणत्याही अडथळ्याविना पूर्ण झाली असून त्यामुळे या मार्गावर लवकरच प्रवासी सेवा सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे.

यापूर्वी झालेल्या चाचणीत काही तांत्रिक अडचणी आढळून आल्या होत्या. मात्र रिसर्च डिझाइन्स अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशनच्या सहकार्याने या सर्व त्रुटी तातडीने दूर करण्यात आल्या. आज झालेल्या ट्रायल रनमध्ये मेट्रोच्या विविध तांत्रिक बाबींची सखोल तपासणी करण्यात आली. यामध्ये सुरक्षितता प्रणाली, वीज पुरवठा, आपत्कालीन ब्रेकिंग सिस्टम, ट्रॅकची स्थिती तसेच वेगात धावणाऱ्या मेट्रोची हालचाल यांचा समावेश होता.

टाटा समूह आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प राबवला जात आहे. सुमारे २३.३ किलोमीटर लांबीच्या या उन्नत मेट्रो मार्गिकेचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. या प्रकल्पासाठी आतापर्यंत १० हून अधिक मेट्रो रेक पुण्यात दाखल झाले असून उर्वरित २२ रेक लवकरच येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

गणेशखिंड रस्ता, विद्यापीठ चौक आणि परिसरातील वाहतूक कोंडीमुळे त्रस्त असलेल्या नागरिकांसाठी ही मेट्रो सेवा दिलासादायक ठरणार आहे. पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे यांनी सांगितले की, मेट्रो स्थानकांच्या इमारती, प्लॅटफॉर्म आणि प्रवाशांसाठी आवश्यक सोयीसुविधांची कामे वेगाने सुरू आहेत. ३१ मार्चपर्यंत बहुतांश स्थानके प्रवाशांसाठी खुली करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# येरवडा ते कात्रज या भूमिगत बोगद्यासह ५४ किलोमीटरच्या भुयारी मार्ग होणार



**पुणे, ता. ८ :** पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या येरवडा ते कात्रज भूमिगत बोगदा प्रकल्पाने एक पाऊल पुढे टाकले आहे. या प्रकल्पाचा पूर्व-व्यवहार्यता अहवाल पूर्ण झाला असून मुख्यमंत्री कार्यालयाकडून या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. येरवडा ते कात्रज या भूमिगत बोगद्यासह एकूण ५४ किलोमीटरच्या भुयारी रस्ते जाळ्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

एका सार्वजनिक कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, पुणे शहरात जमिनीवर रस्ते रुंदीकरण करण्याला आता मर्यादा आल्या आहेत. शहराच्या एकूण क्षेत्रापैकी केवळ ९ टक्के भाग रस्त्यांसाठी उपलब्ध असून वाहनांची संख्या रस्त्यांच्या क्षमतेपेक्षा दुप्पट झाली आहे. त्यामुळे भविष्यातील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी भूमिगत रस्ते हा दीर्घकालीन आणि प्रभावी पर्याय ठरू शकतो.

येरवडा ते कात्रज हा भूमिगत बोगदा पुणे शहराच्या उत्तर आणि दक्षिण भागाला जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरेल. यामुळे शहरातील अत्यंत गजबजलेल्या रस्त्यांवरील वाहतूक जमिनीखालून वळवली जाणार आहे. या प्रकल्पात केवळ एकच बोगदा नसून एकूण ५४ किलोमीटरचे भुयारी रस्त्यांचे जाळे प्रस्तावित आहे. यामध्ये जगताप डेअरी, सिंहगड रोड, पाषाण, कोथरूड, औंध, संगमवाडी आणि खडकी यांसारख्या प्रमुख भागांचा समावेश असेल.

या संपूर्ण प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे ३२,००० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. राज्य सरकारकडून या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. तसेच हा भूमिगत मार्ग अंतर्गत रिंग रोडशी जोडला जाणार असून त्यामुळे महामार्गांकडे जाणारी वाहतूक अधिक सुलभ होणार आहे.


**लवकरच अहवाल पुम्टाकडे सादर केला जाईल**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या प्रकल्पाचा पूर्व-व्यवहार्यता अहवाल तयार केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता संपल्यानंतर हा अहवाल पुम्टा समोर सादर केला जाणार आहे. तिथून मंजुरी मिळाल्यानंतर हा प्रस्ताव मंत्रिमंडळाकडे पाठवण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे पुण्यातील वाहतूक समस्येवर मोठा दिलासा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विलासराव देशमुखांच्या आठवणी कोणीही पुसू शकणार नाही

**लातूर, ता. ८ :** भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिवंगत काँग्रेसनेते विलासराव देशमुख यांच्याविषयी केलेल्या विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता स्पष्टीकरण दिलंय. विलासराव देशमुख यांच्या आठवणी कोणीही पुसू शकणार नाही. विलासराव देशमुख यांच्याबाबत सर्वांनाच आदर आहे, असं फडणवीसांनी म्हटलं. तसंच आम्ही जरी काँग्रेसच्या विरोधात लढत असलो तरी देखील विलासराव देशमुख यांच्या संदर्भात आणि महाराष्ट्रातील जे प्रमुख नेते आहेत, ज्यांनी महाराष्ट्रात उत्तम काम केलं, त्यापैकी एक विलासराव देशमुख आहेत. हे स्पष्टीकरण चव्हाणांनी देखील दिलं. निवडणुकीच्या काळात कोणीही दिलगिरी व्यक्त करत नाही, पण चव्हाणांनी दिलगिरी व्यक्त केली. कारण त्यांच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ निघाला होता, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

# अजितदादांनी ताफा थांबवून अपघातातील दुचाकीस्वाराची केली विचारपूस



**पुणे, ता. ८ :** उपमुख्यमंत्री अजित पवार हे आजही पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर आहेत. सकाळी जिजाई निवासस्थानावरून पिंपरी-चिंचवडच्या दिशेने जात असताना रेंज हिल परिसरात एका दुचाकीस्वाराचा अपघात झाल्याची घटना घडली. हा अपघात पाहताच अजित पवार यांनी आपला ताफा तात्काळ थांबवला आणि अपघातग्रस्ताच्या मदतीला धाव घेतली.

अजित पवार यांनी अपघातग्रस्ताची विचारपूस करत अरे बाबा, तुला लागलं नाही ना, गाडी चालवता येईल का, की कुणाला सोडायला सांगू? असे म्हणत त्याला धीर दिला. तसेच हळू गाडी चालव, घाबरू नको, असे सांगत काळजी घेण्याचा सल्ला दिला. अपघातग्रस्ताला तातडीने उपचार मिळावेत यासाठी अजित पवार यांच्या ताफ्यातील म्बुलन्समधून रुग्णालयात पाठवण्यात आले. या घटनेदरम्यान काही काळ त्या परिसरात वाहतूक कोंडी झाली होती. अजित पवारांना पाहून अनेक वाहनचालकांनी आपली वाहने थांबवली आणि त्यामुळे परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी तिथून लवकर निघणे पसंत केले.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवार आक्रमक प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत. गेल्या ९ वर्षांच्या भाजपच्या सत्ताकाळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ते सातत्याने करत आहेत. गुंडगिरी, दादागिरी आणि दहशतीच्या जोरावर महापालिका लुटली गेल्याचा आरोप करत त्यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे.

या आरोपांना उत्तर देताना भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी अजित पवारांवर पलटवार केला आहे. पिंपरी-चिंचवडमधील भ्रष्टाचाराच्या आकाला संपवायचे असल्याचे विधान अजित पवार यांनी केल्यानंतर, लांडगे यांनी प्रत्युत्तर देत अजित पवार हेच राज्यातील भ्रष्टाचाराचे आका असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत आरोप-प्रत्यारोपांची लढाई अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे.

# प्रियकराच्या घरभाड्यासाठी अल्पवयीन प्रेयसीचा काकाच्या बंगल्यात दरोडा; दोघांना अटक




**पुणे, ता. ८ :** प्रियकराला घरभाडे देण्यासाठी ३० हजार रुपयांची गरज असल्याने अल्पवयीन प्रेयसीनेच आपल्या काकाच्या बंगल्यात दरोडा टाकण्याचा कट रचल्याचा धक्कादायक प्रकार पुण्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी येरवडा पोलिसांनी प्रियकरासह दोन उच्चशिक्षित तरुणांना अटक केली आहे. यश मोहन कुऱ्हाडे (वय २० रा केसनंद, ऋषभ प्रदीप सिंह वय २१ रा चऱ्होली) आणि राज विवेक भैरामडगीकर (वय २० रा येरवडा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत ३५ वर्षीय महिलेने येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी महिला या कुटुंबासह कल्याणीनगर येथील आपल्या बंगल्यात राहतात. सोमवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास अचानक दोन अनोळखी तरुण चाकू आणि दोरी घेऊन त्यांच्या बंगल्यात शिरले. घरात घुसलेल्या व्यक्तींना पाहताच घरातील महिलांनी जोरात आरडाओरडा केला. त्यामुळे घाबरून हे दोघेही कोणतीही चोरी न करता तिथून पळून गेले. घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेची माहिती मिळताच येरवडा पोलिसांनी तपास सुरू केला. संशयावरून दोन तरुणांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता या दरोड्याच्या कटाचे बिंग फुटले. चौकशीत असे समोर आले की, आरोपी यश कुऱ्हाडे याचे तक्रारदार महिलेच्या दिराच्या अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंध होते. घरभाडे भरण्यासाठी ३० हजार रुपयांची गरज असल्याचे कुऱ्हाडे याने आपल्या प्रेयसीला सांगितले होते. त्यानंतर प्रेयसीने आपल्या काकाच्या बंगल्यात चोरी करण्याचा कट रचला. योजनेनुसार दरोडा टाकण्यासाठी कुऱ्हाडे आणि त्याचे मित्र येणार असल्याने संबंधित मुलीने घराचे दार उघडे ठेवले होते. मात्र आरोपी घरात शिरताच महिलांनी आरडाओरडा केल्याने दरोड्याचा प्रयत्न फसला. या प्रकरणी तिघांनाही अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

यश कुऱ्हाडे हा बारावी नापास असून ऋषभ सिंह हा मेकॅनिकल इंजिनिअर आहे, तर राज भैरामडगीकर हा इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांनी दिली आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## डाएटिंग करण्यापूर्वी 'हे' नक्की वाचा

आजच्या धावपळीच्या युगात 'फिट' दिसण्यापेक्षा 'बारीक' दिसण्याकडे तरुणाईचा कल अधिक आहे. यासाठी अनेक जण तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय स्वतःच 'डाएट प्लॅन' तयार करतात किंवा इंटरनेटवरील माहितीच्या आधारे सतत डाएटिंग करतात. मात्र, हे सततचे डाएटिंग शरीरासाठी फायद्याचे ठरण्याऐवजी तोट्याचे ठरत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

सतत डाएटिंग करण्याचे गंभीर परिणाम : तज्ज्ञांच्या मते, दीर्घकाळ किंवा चुकीच्या पद्धतीने डाएटिंग केल्यास खालील समस्या उद्भवू शकतात.

चयापचय क्रिया मंदावणे : सतत कमी कॅलरीज घेतल्यामुळे शरीराची ऊर्जा खर्च करण्याची क्षमता कमी होते. यामुळे डाएटिंग थांबवताच वजन पुन्हा वेगाने वाढू लागते.

पोषक तत्वांचा अभाव : अन्नातून मिळणारी जीवनसत्त्वे, खनिजे आणि प्रथिने कमी झाल्यामुळे केस गळणे, त्वचा निस्तेज होणे आणि हाडे ठिसूळ होणे अशा समस्या निर्माण होतात.

मानसिक आरोग्यावर परिणाम : सततच्या डाएटिंगमुळे चिडचिडेपणा वाढतो, एकाग्रता कमी होते आणि काही प्रकरणांमध्ये 'टिंग डिसऑर्डर' किंवा नैराश्यासारखे गंभीर आजारही बळकावू शकतात.

हार्मोनल असंतुलन : विशेषतः महिलांमध्ये सततच्या डाएटिंगमुळे मासिक पाळीशी संबंधित समस्या आणि हार्मोन्सचे संतुलन बिघडण्याचे प्रकार वाढले आहेत.

'क्रॅश डाएट' ठरू शकते घातक : काही दिवसांतच लग्न किंवा एखादा कार्यक्रम आहे म्हणून 'क्रॅश डाएट' (उदा. फक्त पाणी किंवा रस पिणे) करणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. अलीकडेच अशा प्रकारच्या टोकाच्या डाएटिंगमुळे काही तरुणांना आपला जीव गमवावा लागल्याच्या घटनाही घडल्या आहेत. यामुळे किडनीवर ताण येणे किंवा अचानक हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका असतो.

तज्ज्ञ काय म्हणतात? : वजन कमी करणे म्हणजे उपाशी राहणे नव्हे. प्रत्येक शरीराची गरज वेगळी असते. तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय केलेले डाएटिंग तुमच्या अवयवांना कायमस्वरूपी इजा पोहोचवू शकते. संतुलित आहार आणि नियमित व्यायाम हाच सुदृढ राहण्याचा एकमेव मार्ग आहे.

नेहमी डाएटिंग करण्यापेक्षा 'हेल्दी लाइफस्टाईल' स्वीकारणे कधीही उत्तम आहे. आठवड्यातून एकदा 'चीट मील' घेणे किंवा सर्व प्रकारचे अन्नपदार्थ मर्यादित प्रमाणात खाणे हे दीर्घकालीन आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

# कुरकुंभ एमआयडीसीत केबल चोरणारी टोळी दौंड पोलिसांकडून जेरबंद; १२ लाखांचा मुद्देमाल जप्त

## स्वामी चिंचोली येथील ८ आरोपी जेरबंद

**दौंड, ता. ८ :** कुरकुंभ एमआयडीसी परिसरातील पांढरेवाडी येथील कंपनीतून महागड्या केबल चोरणाऱ्या स्वामी चिंचोली (ता. दौंड) येथील ८ चोरट्यांना दौंड पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून १२ लाख २१ हजार ८५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अशी माहिती दौंडचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिली.

अल्ताफ चांदशेख (रा. स्वामी चिंचोली, ता. दौंड) सोनू मोईन अहमद, शाह आलम रोशन अली, दीपक कुमार शिवचरण, अर्जुन कुमार निगम, नूर मोहम्मद खलील, अतिक रहिमान हजरत अली खान, हनुमंत अंगद लिमकर (सर्व रा. चंपापुर शहरात गड जिल्हा सिद्धार्थ नगर राज्य उत्तर प्रदेश सध्या राहणार गुणवरे वस्ती, स्वामी चिंचोली ता. दौंड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी (ता. ०७) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पांढरेवाडी (ता. दौंड) गावच्या हद्दी मधील इन्फोकॉम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतून काळ्या रंगाच्या प्लास्टिक आवरणाची २ लाख २१ हजार ८५० रुपयांची कॉपर केबल (प्रति मीटर ४ हजार ४३७ रुपये) अशी चोरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची तक्रार देण्यात आली होती. त्यानुसार दौंड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल




करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी तात्काळ तपास पथक नेमण्याचे आदेश दिले. गोपनीय बातमीदार, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपींच्या ताब्यातील इनोव्हा कार ची तपासणी केली असता चोरीस गेलेली कॉपर केबल आढळून आली. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून सदर वाहनासह अंदाजे १० लाख रुपये किमतीची कार जप्त करण्यात आली आहे.

दरम्यान, या टोळीचा प्रमुख मोहरक्या अल्ताफ चांद शेख हा दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली येथील असून त्याने यापूर्वीही अनेक चोऱ्या केल्या असल्याचा संशय आणि शक्यता आहे. त्याच्यावर दौंड भिगवण, बारामती, इंदापूर पोलीस ठाण्यात विविध गुन्हे दाखल असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. त्यामुळे पोलिसांनी या टोळीची सखोल चौकशी करून गंभीर गुन्हे केले आहेत का ? याचा कसुन तपास करावा अशी मागणी आता होत आहे.

ही कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गोपाळ पवार, पोलीस उपनिरीक्षक श्रीरंग शिंदे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शंकर वाघमारे, पोलीस हवालदार किरण पांढरे, पोलीस हवालदार निखिल जाधव, पोलीस हवालदार अमीर शेख, नितीन बोराडे, सुभाष राऊत, पोलीस शिपाई संजय कोठावळे यांच्या पथकाने केली. आरोपींना गुन्ह्यांच्या तपासासाठी अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील अधिक तपास पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कुरकुंभ पोलिस मदत केंद्र येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीरंग शिंदे करीत आहेत.

## सचिन खरात यांनी महापालिका निवडणुकीतून घेतली माघार

**पुणे, ता. ८ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. पुणे महापालिका निवडणुकीत गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार उभे केल्याचा आरोप राष्ट्रवादीवर होत असताना, हे उमेदवार सचिन खरात गटाचे असल्याचे अजित पवारांकडून सांगितले जात होते. मात्र आता स्वतः सचिन खरात यांनीच तडकाफडकी महापालिका निवडणुकीतून माघार घेतली आहे.

सचिन खरात यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट भूमिका मांडली आहे. सन्मानपूर्वक जागा मिळाव्यात म्हणून आपण अजित पवार यांच्यासोबत गेलो होतो, मात्र अपेक्षित जागा मिळाल्या नाहीत. त्यामुळे पुणे महापालिकेच्या निवडणूक प्रक्रियेतून आपण बाहेर पडत असल्याचे त्यांनी जाहीर केले. यापुढे कोणत्याही पक्षाला किंवा कोणत्याही उमेदवाराला आपला पाठिंबा नसेल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.



खरात म्हणाले की, त्यांचा पक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालतो. त्या विचारांना तिलांजली देऊन कोणतेही चुकीचे काम आपण करणार नाही. राजकीयदृष्ट्या दोन पावले मागे यावे लागली तरी चालतील, पण चुकीचा मार्ग स्वीकारणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांच्या मुद्द्यावरून अजित पवार यांनी या प्रकरणाची जबाबदारी सचिन खरात यांच्यावर टाकण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने कोणत्याही गुन्हेगाराला उमेदवारी दिलेली नाही. सचिन खरात यांच्यासोबत युती असल्यामुळे त्यांच्या वाट्याच्या जागांवर उमेदवार देण्याचा अधिकार त्यांना होता, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे. पुण्यातील कुख्यात गुंड टोळीतील काही सदस्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे एबी फॉर्म भरल्याचा आरोपही याच पार्श्वभूमीवर चर्चेत आला आहे. या घडामोडींमुळे पुणे महापालिका निवडणुकीतील राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

## गुलशन कुमार यांची हत्या करणाऱ्या शूटरचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर, ता. ८ :** टी सिरीजचे मालक गुलशन कुमार यांच्या हत्येप्रकरणातील मुख्य शूटर अब्दुल मर्चंट याचा छत्रपती संभाजीनगरमधील हर्सूल कारागृहात मृत्यू झाला आहे.

गुरुवारी सकाळी त्याला हृदयविकाराचा झटका आल्याने घाटी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. अब्दुल मर्चंट हा या हायप्रोफाईल हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत होता.

ऑगस्ट १९९७ मध्ये मुंबईतील अंधेरी येथील एका मंदिरातून बाहेर पडत असताना अब्दुल मर्चंटने गुलशन कुमार यांच्यावर १६ गोळ्या झाडल्या होत्या. खंडणीसाठी अबू सालेमच्या सांगण्यावरून हे हत्याकांड घडवण्यात आले होते. गुलशन कुमार यांच्याकडे १० कोटींची मागणी करण्यात आली होती, मात्र त्यांनी ती फेटाळून लावत वैष्णो देवी मंदिरात भंडारा घालण्याचे उत्तर दिले होते. या हत्येनंतर शूटरने अबू सालेमला फोन लावून गुलशन कुमार यांचा कळवळण्याचा आवाज ऐकवला होता, अशी माहिती समोर आली होती.

कॅसेट किंग म्हणून ओळखले जाणारे गुलशन कुमार यांनी मेहनतीने स्वतःचे साम्राज्य उभे केले होते, परंतु अंडरवर्ल्डच्या दहशतीमुळे त्यांचा दुर्दैवी अंत झाला.

या हत्येतील प्रमुख आरोपीचा आता तुरुंगातच अंत झाल्याने पुन्हा एकदा हे प्रकरण चर्चेत आले आहे. हर्सूल कारागृह प्रशासनाकडून या मृत्यूबाबत पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जात आहे.




## पीएमपीएमएलच्या ताफ्यात ५० नवीन वातानुकूलित ई-बस दाखल होणार

**पुणे, ता. ८ :** पुणेकर प्रवाशांसाठी आनंदाची बातमी असून जानेवारी अखेरपर्यंत पीएमपीएमएलच्या ताफ्यात ५० नवीन वातानुकूलित ई-बस दाखल होणार आहेत. ओलेक्ट्रा कंपनीकडून खरेदी केलेल्या या बसची तांत्रिक तपासणी करण्यासाठी पीएमपीचे पथक सध्या हैदराबादला गेले आहे. यापैकी पहिल्या २५ बस येत्या ४ ते ५ दिवसांत पुण्यात येतील, तर उर्वरित २५ बस जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत मिळतील. या सर्व बस निगडी आगारातून चालवल्या जाणार असून यामुळे दररोज सुमारे ५० हजार प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे.

या बसच्या जलद चार्जिंगसाठी निगडी आगारात ५ नवीन डीसी चार्जर बसवण्यात येत आहेत. यामुळे बस चार्ज होण्याचा वेळ ३ तासांवरून केवळ ४० ते ५० मिनिटांवर येणार आहे. जलद चार्जिंग सुविधेमुळे बसच्या फेऱ्या वाढतील आणि प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागणार नाही. प्रदूषणमुक्त प्रवासाला गती देणाऱ्या या बसचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होण्याची दाट शक्यता आहे.

पीएमपीचे अध्यक्ष पंकज देवरे यांनी सांगितले की, आवश्यक प्रमाणपत्रे मिळाल्यानंतर या बस तातडीने प्रवाशांच्या सेवेत रुजू होतील. गेल्या वर्षी काही तांत्रिक अडचणींमुळे या बस येण्यास विलंब झाला होता, मात्र आता ही प्रतीक्षा संपली आहे. या नवीन ई-बसमुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होईल.

## म्हसोबाचीवाडी येथे नातवानेच आजीची जमीन बळकावली

**पुणे, ता. ८ :** भिगवण पोलीस ठाण्यात म्हसोबाचीवाडी (ता. इंदापूर, जि. पुणे) येथील ८० वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीवरून जमीन व्यवहाराशी संबंधित फसवणुकीच्या आरोपाखाली सहा जणांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत. फिर्यादी गोदाबाई नानासाहेब चांदगुडे (वय ८० वर्षे, व्यवसाय सुखवास्तु, रा. म्हसोबाचीवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी त्यांच्या वयोवृद्धपणाचा व अडाणीपणाचा फायदा घेत शासकीय पैसे मिळणार असल्याचे आमिष दाखवले.



त्यानंतर त्यांना बारामती येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नेण्यात आले. तेथे फिर्यादीच्या नावावर असलेली मौजे म्हसोबाचीवाडी येथील गट क्रमांक ५१७ मधील २९ आर जमीन आरोपी रमेश बबन चांदगुडे (रा. म्हसोबाचीवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) याच्या नावावर करून घेतल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे. या व्यवहाराच्या बदल्यात बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत कमी अशी दोन लाख चाळीस हजार रुपयांची रक्कम फिर्यादीच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली.

तक्रारीनुसार, ही संपूर्ण रक्कम नंतर फिर्यादीचा नातू प्रितम पांडुरंग मंडलीक (रा. तावशी, ता. इंदापूर, जि. पुणे) याने गोड बोलून बँकेत नेऊन काढून घेतली. सदर प्रकार ७ ते १४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत म्हसोबाचीवाडी, शेटफळगढे, घोलपवाडी तसेच बारामती येथील दुय्यम निबंधक कार्यालय परिसरात घडला आहे.

या प्रकरणात इतर आरोपी म्हणून कुलदीप पोपट रकटे (रा. कळम, ता. इंदापूर, जि. पुणे),ओम नागेश लोढे (रा. बारामती, ता. बारामती, जि. पुणे), मयूर बापू रसाळ (रा. मळद, ता. बारामती, जि. पुणे) आणि सागर दादा भिसे (रा. काटेवाडी, ता. बारामती, जि. पुणे) यांचाही समावेश आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास भिगवण पोलीस करत आहेत.

## वडगाव शेरीत दगडफेक, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

**पुणे, ता. ८ :** राज्यात महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच निवडणूक काळातील वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुण्यातील वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातही दगडफेक आणि मारामारीची गंभीर घटना घडली आहे.

वडगाव शेरीतील सोपाननगर परिसरात मंगळवारी रात्री उशिरा तरुणांच्या दोन गटांमध्ये जोरदार राडा झाला. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये रस्त्यावर पडलेल्या दुचाकी, तरुणांच्या हातात मोठे दगड आणि एकमेकांवर सुरू असलेली दगडफेक स्पष्टपणे दिसून येत आहे. रस्त्यावर प्रचंड गोंधळाचे वातावरण



निर्माण झाल्याचेही व्हिडिओत पाहायला मिळत आहे.

या घटनेनंतर सोपाननगर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. भयमुक्त व दहशतमुक्त वडगाव शेरीची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

महानगरपालिका निवडणुकांमुळे आधीच पोलीस प्रशासनावर ताण असताना, अशा हिंसक घटनांमुळे आव्हान अधिकच वाढले आहे. या प्रकरणी संबंधित व्हिडिओच्या आधारे दोषींवर काय कारवाई केली जाणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## निवडणुकीच्या पाश्वभूमीवर १५ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी जाहीर

**पुणे, ता. ८ :** महाराष्ट्र सरकारने १५ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. संबंधित विभागाने ६ जानेवारी रोजी याबद्दलची अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध केली असून, ही सुट्टी सरकारी कार्यालयांसह बँका आणि निमसरकारी संस्थांनाही लागू असेल. मतदारांना आपला मतदानाचा हक्क विना अडथळा बजावता यावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

या निर्णयानुसार, मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, ठाणे आणि पिंपरी-चिंचवडसह २९ शहरांमधील खासगी कंपन्या, आयटी पार्क आणि कारखान्यांनाही आपल्या कर्मचाऱ्यांना सुट्टी देणे बंधनकारक आहे. ज्या ठिकाणी पूर्ण सुट्टी देणे शक्य नसेल, तिथे कर्मचाऱ्यांना मतदानासाठी किमान २ ते ३ तासांची सवलत द्यावी लागणार आहे. ही




सवलत भरपगारी असणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कायदेशीर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

**येथे पाहा शहरांची यादी**

पश्चिम महाराष्ट्र : पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी आणि सांगली-मिरज-कुपवाड.

उत्तर महाराष्ट्र : नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर (अहमदनगर), जळगाव आणि धुळे.

मराठवाडा : छत्रपती संभाजीनगर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना आणि लातूर.

विदर्भ : अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर.

निवडणूक होणाऱ्या शहरांमध्ये नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि सोलापूर यांसारख्या प्रमुख ठिकाणांचा समावेश आहे. आपल्या निवडणूक क्षेत्राबाहेर काम करणाऱ्या मतदारांनाही या सवलतीचा लाभ घेता येईल. जास्तीत जास्त नागरिकांनी मतदानासाठी बाहेर पडावे, यासाठी राज्य सरकारने परक्राम्य संलेख अधिनियमांतर्गत ही सुट्टी घोषित केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती शंभूराजे भेट पालखी सोहळ्याचे जल्लोषात स्वागत

**लोणी काळभोर ता. ८ :** छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती शंभुराजे भेट पालखी सोहळ्याचे स्वागत कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील लोणी स्टेशन येथे गुरुवारी (ता. ८) जल्लोषात करण्यात आले. या वेळी जय भवानी, जय शिवाजी, छत्रपती संभाजी महाराज की जय, जय शिवराय या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

लोणी स्टेशन चौकात पालखी रथाचे आगमन झाले. या वेळी कदमवाकवस्तीचे उद्योजक सचिन काळभोर, रूपराज काळभोर माजी सरपंच नंदू काळभोर व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वराज्य संघाचे अध्यक्ष बाजीराव महाराज बांगर, पालखी सोहळ्याचे अध्यक्ष



ज्ञानोबा कुंजीर, हवेली तालुका पालखी सोहळा संघटक लक्ष्मण चव्हाण यांचे स्वागत करण्यात आले. शाहीर महेश खुळपे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी परिसरातील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वराज्य संघ महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने श्री शिवनेरी गड (ता. जुन्नर) ते श्री पुरंदर गड (ता. पुरंदर) या मार्गावर दरवर्षी या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज या पिता-पुत्राची अखेरच्या क्षणी भेट झाली नाही, म्हणून ही अधुरी राहिलेली भेट या पालखी सोहळ्याच्या माध्यमातून प्रतिवर्ष घडवून आणली जाते. या पालखी सोहळ्याचे ध्येय व उद्दिष्ट छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची माहिती देणे, शिवचरित्राचा प्रसार करणे, शिवरायांचे पराक्रम, रयतेसाठी राबवलेल्या विविध योजना अशी अनेक प्रकारची माहिती या वेळी देण्यात आली.

दरम्यान, शिवचरित्र व शंभूचरित्र कथाकार ह.भ.प. बाजीराव महाराज बांगर यांच्या संकल्पनेतून हा पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या पालखीचे हे ८ वे वर्ष आहे. या पालखी सोहळ्याच्या माध्यमातून छत्रपती शिव शंभुचे विचार तळागाळा पर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे. या पालखी सोहळ्यातील मार्गावरील गावात व्याख्याणे प्रवचणे व इतिहासाचा जागर केला जातो.